ठाणे महानगरपालिका, ठाणे
संचालित
**चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था**
महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्मधिकारी ग्रंथालय इमारत, तळ मजला, वेदांत शॉपींग कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (प.) ४०० ६०६. दुरध्वनी ०२२-२५८८१४२१

## "स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी मार्गदर्शन वर्ग (Foundation Batch) २०२५-२६"

### प्रवेश परीक्षा- २०२५

ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणारी अग्रगण्य संस्था आहे. तसेच, अशा पध्दतीने प्रशासकीय प्रशिक्षण संस्था चालविणारी देशात ठाणे महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा पूर्व परीक्षेकरिता विद्यार्थी/ प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण मिळणेकरिता ठाणे महानगरपालिका, ठाणे संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या "स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी मार्गदर्शन वर्गात (Foundation Batch)" प्रवेश देणेकरिता रविवार दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी संस्थेमार्फत एक ऑफलाईन लेखी प्रवेश परीक्षा (चाचणी परीक्षा) घेतली जाणार आहे. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने https://forms.epravesh.com/CDInstitute/ या लिंकला क्लिक करुन विहित नमून्यात प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत.

संस्थेत प्रवेश देणेकरिता विद्यार्थ्यांची/ प्रशिक्षणार्थींची निवड ही ऑफलाईन लेखी प्रवेश परीक्षा (चाचणी परीक्षा) व ऑफलाईन मुलाखतीद्वारे गुणवत्तेच्या आधारे प्रचलित पध्दतीने करण्यात येणार आहे. संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेच्या अटी व शर्ती, पात्रता, प्रवेश प्रक्रिया इत्यादी बाबींबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. **प्रवेश क्षमता** - १०० प्रशिक्षणार्थी

२. **प्रवेश परीक्षा पध्दती : ऑफलाईन पध्दतीने**

लेखी परीक्षा १०० गुण (ऑफलाईन पध्दतीने) आणि मुलाखत ५० (ऑफलाईन पध्दतीने) गुण अश्याप्रकारे संस्थेची प्रवेश परीक्षा एकूण १५० गुणांची राहील. सदर प्रवेश परीक्षेकरिता नकारात्मक गुण पध्दती लागू होणार नाही.

| विषय | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| **सामान्य अध्ययन भाग – १ (SECTION-I)**<br>1. **CURRENT AFFAIRS & GENERAL KNOWLEDGE.**<br>2. **GENERAL MATHEMATICS UPTO 10th STANDARD.**<br>3. **LOGICAL REASONING.**<br>4. **ENGLISH LANGUAGE COMPREHENSION AND GRAMMAR SKILLS.** | १०० | १०० | ENGLISH | एकूण वेळ : २ तास सकाळी ११.०० ते १.०० वाजेपर्यंत |
| **मुलाखत** | | ५० | English, Hindi & Marathi | |

Scanned with OKEN Scanner

- सामान्य अध्ययन भाग - १ (SECTION-I) या विषयाचा पेपर सकाळी ११.०० ते १.०० वाजेपर्यंत घेण्यात येईल.
- केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षाप्रमाणे गुणवत्ता यादी सामान्य अध्ययन भाग-१ (SECTION- I) या भागावरील गुणांवर व मुलाखत मध्ये प्राप्त गुणांवर आधारित राहील.

**३. प्रवेश परीक्षेचा दिनांक** : रविवार, दि. २१ सप्टेंबर २०२५

**४. परीक्षेचा कालावधी** : सकाळी ११.०० ते १.०० ( एकूण - १२० मिनिटे/ दोन तास )

**५. प्रवेश परीक्षा अर्हता/ पात्रता :-**

अ) उच्च माध्यमिक परीक्षेत विज्ञान, वाणिज्य, कला शाखेत व पदविका परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अर्ज करणेस पात्र आहेत.

ब) वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम वर्ष (F.Y. Sci / F.Y.B.com / F.Y.BA / F.Y. Eng. Degree) आणि द्वितीय वर्षात (S.Y. Sci / S.Y.B.com / S.Y.BA / S.Y. Eng. Degree) शिक्षण घेणारे विद्यार्थी या प्रवेश परीक्षेस अर्ज करणेस पात्र आहेत.

क) उमेदवार महाराष्ट्राचा अधिवास/रहिवासी असला पाहिजे. (Domicile of Maharashtra)

**६. अर्ज करण्याची पध्दत :-**

१) ऑनलाईन अर्जाची लिंक संस्थेच्या www.cdinstitute.net आणि ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

2) ऑफलाईन लेखी प्रवेश परीक्षा अर्ज हे संस्थेकडील विहित नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने, टपालद्वारे, कुरिअरद्वारे, तसेच ई-मेल द्वारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घेण्यात यावी.

**७. प्रवेश परीक्षा संबंधीत महत्वाची माहिती - वेळापत्रक**

अ) प्रवेश अर्ज सादर करण्याचा कालावधी : दिनांक -०१/०८/२०२५ ते १५/०९/२०२५
(Link :- https://forms.epravesh.com/CDInstitute/)

ब) (ऑफलाईन) प्रवेश परीक्षा दिनांक : रविवार, दिनांक-२१/०९/२०२५
वेळ सकाळी ११.०० ते १.००

क) मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द : दिनांक -२४/०९/२०२५

ड) मुलाखतीचा दिनांक : दिनांक -२५/०९/२०२५ ते २६/०९/२०२५

इ) अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द : दिनांक -२९/०९/२०२५

८. अंतिम निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींना केवळ सलग तीन वर्षे संस्थेत मार्गदर्शन मिळणेकरिता हा प्रवेश असेल.

९. कोणत्याही कारणास्तव प्रवेश नाकारण्याचे व वेळापत्रकात बदल करण्याचे अधिकार संस्थेस राहतील.

१०. परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती व सूचना संस्थेच्या नोटीस बोर्डावर तसेच संस्थेच्या www.cdinstitute.net या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

११. अधिक माहितीसाठी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र भुषण ति. डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालय इमारत, तळमजला, वेदांत कॉम्प्लेक्स समोर, कोरस रोड, वर्तकनगर, ठाणे (प.) येथे सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ या कार्यालीयन वेळेत समक्ष येऊन संपर्क साधवा.

( महादेव जगताप )
संचालक,
चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

Scanned with OKEN Scanner